# जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय, रत्नागिरी
## उपचिटणीस शाखा

दूरध्वनी क्र. :-०२३५२-२२२३०१ फॅक्सक्र.०२३५२-२२६२५०

Email ID:- **homebranchrtn@yahoo.in**


क्र.उचिशा/पोल-2/ब्रेक द चेन/2021 दिनांक- 30/04/2021

**वाचले:**

1) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, 1897 व महाराष्ट्र कोव्हीड-19 उपाययोजना नियम, 2020
2) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, 2005
3) फौजदारी प्रक्रिया संहिता, 1973 चे कलम 144
4) महाराष्ट्र शासनाकडील आदेश No.DMU/2020/CR.92/DisM-1,दिनांक 04,05,09,13,20,21 एप्रिल 2021
5) या कार्यालयाकडील क्र.उचिशा/पोल-2/ब्रेक द चेन/2021 व क्र.उचिशा/पोल-2/ब्रेक द चेन/ पु.आ.1/2021 सम दिनांक 05/04/2021, दिनांक 09/04/2021, दिनांक 14/04/2021, दिनांक 20/04/2021, व दिनांक 22/04/2021 रोजीचे आदेश / पुरवणी आदेश
6) महाराष्ट्र शासनाकडील आदेश No.DMU/2020/CR.92/DisM-1, दिनांक 29 एप्रिल 2021

---

**<u>कोरोना विषाणू (कोव्हीड-19) संसर्ग साखळी तोडण्यासाठी प्रतिबंधात्मक</u>**

**<u>आदेश</u>**

ज्याअर्थी, शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हीड-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी महाराष्ट्र राज्यात साथ रोग प्रतिबंधक कायदा, 1897, दिनांक 13 मार्च, 2020 पासुन लागु करुन खंड 2,3,4 मधील तरतूदींनूसार अधिसूचना निर्गमीत केलेली आहे.

आणि ज्याअर्थी, जागतिक आरोग्य संघटनेने करोना विषाणू संक्रमण हा जागतिक साथीचा रोग (World Pandemic) घोषित केला असून, शासन, सार्वजनिक आरोग्य विभागाकडील उपरोक्त संदर्भ अ.क्र.6 चे अधिसूचनेद्वारे करोना विषाणूचा प्रसार रोखण्याकामी " महाराष्ट्र कोविड-19 उपाययोजना नियम 2020 " प्रसिध्द केलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, उपरोक्त वाचले क्र. 6 अन्वये शासनाने दिनांक 29 एप्रिल 2021 रोजी आदेश निर्गमित केलेले असून सदर आदेशाची रत्नागिरी जिल्ह्यामध्ये अंमलबजावणी करणेसाठी, आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 अंतर्गत प्राप्त अधिकाराचा वापर करुन **मी लक्ष्मीनारायण मिश्रा, जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण रत्नागिरी** खालील प्रमाणे निर्देश देत आहे.

राज्य शासनाकडील संदर्भ क्रमांक 6 चे आदेशान्वये कारोना विषाणू (कोव्हीड-19) चा फैलाव मोठया प्रमाणावर होत असल्याने कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम - 2005, भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम - 1897 व महाराष्ट्र कोव्हीड-19 उपाययोजना नियम - 2020 ची अंमलबजावणी करणेसाठी ठोस उपाययोजना चालु ठेवणे आवश्यक आहे. सबब कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखणेसाठी आणि त्यावर उपाय योजना म्हणून आपत्कालीन उपाययोजना करणे आवश्यक असल्याने व प्रभावीपणे संक्रमणाची साखळी तोडणेसाठी 1 मे, 2021 चे सकाळी 07.00 वाजलेपासून दिनांक 15 मे, 2021 रोजी सकाळी 7.00 वाजेपर्यंत संदर्भ क्रमांक 4 व 5 चे आदेशान्वये निर्गमित करणेत आलेले निर्बंध वाढविणेत येत आहेत.

सदरचा आदेश संपुर्ण रत्नागिरी जिल्ह्याच्या क्षेत्रासाठी (प्रतिबंधीत क्षेत्र वगळून) लागू राहील.

सदरच्या आदेशाची अंमलबजावणी दिनांक 1 मे, 2021 रोजी सकाळी 07.00 वाजलेपासून ते दिनांक 15 मे 2021 चे सकाळी 07.00 वाजेपर्यंत अंमलात राहील. सदरचा आदेश आज दिनांक 30/04/2021 रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी निर्गमित करण्यात येत आहे. उपरोक्त आदेशाचे पालन न करणाऱ्या कोणत्याही व्यक्ती अथवा संस्थेवर भारतीय साथरोग अधिनियम 1897 आणि आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 मधील तरतुदीप्रमाणे कारवाई करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.

संदर्भ क्र. 4 व 5 मधील आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधित आदेशात नमुद केल्यानुसार दंडात्मक कार्यवाही करणेसाठी संबंधित क्षेत्रातील स्थानिक प्रशासन / पोलीस प्रशासन / नगर परिषद / नगर पंचायत / ग्रामपंचायत / आरोग्य विभाग / अन्न व औषध प्रशासन विभाग यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

जिल्हा दंडाधिकारी
सत्यमेव जयते
रत्नागिरी

(लक्ष्मीनारायण मिश्रा)
जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,
रत्नागिरी

**प्रत - माहितीसाठी तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**

1) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी
2) पोलीस अधीक्षक, रत्नागिरी
3) जिल्हा शल्य चिकित्सक, रत्नागिरी
4) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी
5) उपविभागीय दंडाधिकारी, (सर्व)
6) तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, (सर्व)
7) तहसीलदार सर्वसाधारण (जिल्हाधिकारी कार्यालय,रत्नागिरी) संकलन-13 यांजकडे पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी
8) सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन विभाग, रत्नागिरी
9) मुख्याधिकारी, नगरपालिका / नगरपरिषद (सर्व)
10) जिल्हा माहिती अधिकारी, रत्नागिरी